# 8 जानेवारी

**आजचा सुविचार :**

क्षमतेपेक्षा जास्त धावलं की दम लागतो आणि क्षमतेपेक्षा जास्त धावायला पण दमच लागतो.”

**आजचे पंचांग :**

वार – शनिवार
दिनांक : 8 जानेवारी 2022
मास – पौष
नक्षत्र – उत्तर भाद्रपदा
सुर्योदय – सकाळी 7.01 वाजता
सूर्यास्त सायंकाळी 6.16 वाजता

**आजचे दिनविशेष :**

2000 : लता मंगेशकर यांची 1999 साठीच्या एन. टी. रामाराव राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.
2001 : भारत व व्हिएतनाम दरम्यान सांस्कृतिक, पर्यटन आणि अणू ऊर्जेचा शांततेसाठी वापर करण्याच्या तीन करारांवर सह्या झाल्या.

**आजचे इंग्लिश शब्द :**

1) End – शेवट 2) Enemy - शत्रू 3) Empty – रिकामे 4) Election – मतदान

**आजची प्रश्नमंजुषा :**

1) चार मुख्य दिशा दाखवा.

2) 20 + 40 + 30 = किती?

3) प्राण्यांच्या कडून आपल्याला कोणते आहार पदार्थ मिळतात?

4) आपण कोरोपासून बचाव कसा करू शकतो?

**बोधकथा :**

## जेंव्हा प्रतिकूल परिस्थिती दार ठोठावते

ही गोष्ट, वेगवेगळे लोक, प्रतिकूल परिस्थितीशी कसा वेगवेगळ्या प्रकारे सामना करतात हे सांगते. आशाच्या वडिलांनी एक अंडे, एक बटाटा आणि काही चहाची पाने, वेगवेगळ्या भांड्यांमध्ये उकळत्या पाण्यात ठेवली. त्यांनी आशाला दहा मिनिटांसाठी भांड्याकडे लक्ष ठेवण्यास सांगितले. दहा मिनिटानंतर त्यांनी आशाला अंडे आणि बटाट्याचे साल काढण्यास सांगितले आणि चहा गाळून घेण्यास सांगितले. आशा विचारात पडली.

तिचे वडील म्हणाले, “ या तीनही गोष्टी एकाच परिस्थितीत होत्या, पण बघ प्रत्येकाने परिस्थितीला किती वेगवेगळा प्रतिसाद दिला! बटाटा आता मऊ आहे, अंडे टणक आहे आणि चहाने तर पाण्याचा रंगच बदलला. आपण पण ह्या तीनही गोष्टींसारखे आहोत. जेंव्हा प्रतिकूल परिस्थिती असते, आपण अगदी असाच प्रतिसाद देतो.’

तात्पर्य – परिस्थितीशी कसा सामना करायचा हे सर्वस्वी आपल्यावर अवलंबून असते.